# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ३६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२७/०६/२०१६.

**१) कर्जाला कंटाळुन झाडाला गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २६/६/२०१६ रोजी ०५.०० वा. दरम्यान धनराज केशव कडव वय ५० वर्ष, रा. मांडवी हा कर्जाला कंटाळुन तिवसाच्या झाडाला नॉयलॉन दोरीने गळफास घेवुन आत्महत्या करून मरण पावला. असे फिर्यादी कार्तीक धनराज कडव वय २१ वर्ष रा. मांडवी ह.मु. श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. सेलोकर हे करीत आहेत.

**२) मनोरूग्ण मुलीचा विहीरीच्या पाण्यात उडी घेतल्याने मृत्यु . :—**

दिनांक २५/०६/०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान कु. पल्लवी गुनीलाल बिसने वय १९ वर्ष, रा. मांगली  ही मनोरूग्ण रूग्ण असुन हि मांगली येथील विहीरीच्या पाण्यात उडी घेवुन पाण्यात बुडुन मरण पावली. असे फिर्यादी लालचंद ताराचंद बिसने वय ४७ वर्ष, रा. मांगली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. कंळबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) विज अंगावर पडल्याने मृत्यु  :—**

दिनांक २६/०६/२०१६ रोजी १५.३० वा. दरम्यान सौ. जसवंता दुधाराम चुटे वय ५५ वर्ष, रा. मेंढा नगर हि तिच्या पती सोबत घरच्या शेतात तुरी लावण्याकरीता धु—यावर माती टाकत होती. अचानक ढगाळ वातावरण होवुन विज कडाडुन तिच्या अंगावर पडुन ती मरण पावली. असे फिर्यादी रमेश केशव चुटे वय ४५ वर्ष, रा. मेंढा नगर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**४) अंगावर आंब्याचा झाडाचे खोड पडल्याने मृत्यु. :—**

दिनांक २६/०६/२०१६ चे १६.३० वा. दरम्यान राजु श्रीपत बिल्लोरकर वय ४२ वर्ष रा. पेंढरी हा सोनेगाव शेतशिवारात असलेल्या देवराम रावन देशपांडे यांच्या शेतात अंदाजे २ महीण्यापुर्वी पडलेल्या आब्यांच्या झाडाचे तुकडे करण्यासाठी गेला होता. झाड तोडत असतांना दुपारी अंदाजे १६.३० वा. दर त्याच्या अंगावर आंब्याच्या झाडाचे मुख्य खोड पडुन तो दबल्याने त्याला औषधोपचारा करीता दवाखाण्यात नेत असंताना रस्त्यातच मरण पावला. असे फिर्यादी देवदत्त बाबुराव फुंडे वय ५५ वर्ष, रा. सोनेगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. शेंडे पो.स्टे. पालादुंर हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २६/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०२ केसस, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व इतर वाहनांवरती १४३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.